# Electronic International Interdisciplinary Research Journal ( EIIRJ )

**Impact Factor : 0.987**

ISSN : 2277-8721








*Reviewed Online Journal*
*(Bi-Monthly)*
*Mar-April ISSUES*

## Chief-Editor:
## Ubale Amol Baban

www.aarhat.com

INDEX COPERNICUS INTERNATIONAL

CiteFactor
Academic Scientific Journals

2015

# ब्रिटीश कालीन भारतातील दुष्काळः एक ऐतीहासीक अध्ययन

**श्री.राजु दिगंबर कुटे**
पांगरी कुटे
जि.वाशिम

**प्रस्तावना :—**

दुष्काळ ही एक जागतीक गंभीर समस्या असुन प्राचीन काळापासुन चालु आलेली वस्तु स्थिती आहे. आजपर्यंत दुष्काळ ह्या समस्येला जगाला समोरे जावे लागले आहे. दुष्काळ म्हणजे एकुण अन्न धान्याच्या प्रदीर्घ तीव्रतम तुटवड्या मुळे उद्‌भवणारी परिस्थिती ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर उपासमार, बहुसंख्य लोकांची कृशता व क्षीणता त्यामुळे लोकसंख्येच्या मृत्युमानात मोठ्या प्रमाणात वाढ होते. १९व्या शतकाच्या अगोदर दुष्काळ हे निसर्ग निर्मीत असत त्यामध्ये सर्व लोकांची सरसकट उपास मार होवुन मनुष्य, गुरे ढोरे, व वित्त याची भयंकर हानी होत असे. परंतु आजच्या आधुनिक काळामध्ये दुष्काळाचे स्वरूप बदलेले दिसुन येते. यामध्ये श्रीमंतापेक्षा गरीब लोकांचीच जास्त हानी होवुन त्यात तो भरडल्या जात असे. वस्तुच्या किमती वाढतात, बेकारी फैलावते आणि बाजारपेठेत धान्य साठा पुष्कळ असुनही गरीबीच्या लाचारतेमुळे बहुजनांना पुरेसे धान्य मिळत नाही. त्यात शेतकरी वर्गात धान्य कमतरतेमुळे नैराशता येते. या समस्येचा पर्याय शोधु न शकल्यामुळे तो आत्महत्या सारखे पावुल उचलतो. या सारख्या अनेक कारणामुळे मृत्यु दर उंचावतो. श्रीमंत लोकांना अशा दुष्काळाची विशेष झळ सोसावी लागत नाही.

जगात आजपर्यंत पडलेल्या दुष्काळाची माहीती व नोंद अत्यंत अपुरी असुन त्याची नोंद इतिहासात सापडते. यावरून जागतीक दुष्काळाची प्रमुख कारणांचा शोध घेता त्यात निसर्गाच्या अव कृपेने किंवा अनियीमत संतुलनामुळे अन्य धान्याचा तुटवडा, लढाया,अंतर्गत अशांतता, महापुर, पिकावरील किड, टोळ धाडेचे संकट यामध्ये समाजातील दुर्बल घटक व शेतकरी वर्ग होरपळुन जातो. दुष्काळ या समस्येमुळे ग्रामिण जीवन मोठ्या प्रमाणात उध्दस्त व विस्कळीत होते.

भारतीय उपखंडात पडणा—या दुष्काळांच्या कारणांचे विवीध स्वरूप असुन “नेमेचि येतो दुष्काळ” या उक्तीनुसार दुष्काळ हा भारताच्या पाचवीलाच पुंजलेला आहे. यामध्ये बेभरवशी पाउस व हवामान, जंगलतोड, महापुर, अवर्षण याचा शेतीवर अनिष्ट परीणाम होतो. भारत देश कृषिप्रधान असुनही उत्पदनाची पद्‌धत मागासलेलीच आहे. शेत माल वाहतुकी साधनाचा अभाव साठवनुक साधने अपुरी असल्याने अन्य धान्य वितरण प्रादेशिक जरूरी नुसार होत नाही. तसेच लोकसंख्या वाढल्यामुळे भारतीय शेतीवरील ताण वाढुन उत्पन्न व खर्च याचा ताळेबंद न जुळल्या मुळे सतत नापीकी, अतिवृष्टी, गारपीट, अवकाळी पाउस या नैसर्गीक आपत्ती मुळे दुष्काळाच्या झळा ह्या तळागळा पर्यंत पोहचतात.

दुष्काळ ही प्राचीन काळापासुन चालु आलेली वस्तु स्थिती आहे प्राचीन काळात दुष्काळाचे वर्णन संस्कृत साहित्य व परकिय यात्रेकरूच्या उल्लेखावरून दिसुन येते सम्राट चंद्र गुप्त मौर्य काळात पडलेल्या दुष्काळाचे वर्णन चाणक्याच्या ”अर्थशास्त्र“ ग्रंथात मदत

कार्याचा उल्लेख आढळतो. प्राचीन व मध्ययुगीन पडणा—या दुष्काळामुळे जन जिवन विस्कळीत होत होते. परंतु राज्य कर्ताच्या उदार धोरणामुळे प्रसंगी मदत कार्य हाती घेतले जात असे.

इंग्रजांनी विशेषत: ईस्ट इंडिया कंपनी काळात भयंकर दुष्काळ पडल्याच्या नोंदी आहेत. कंपनीच्या राजवटीत भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशात जवळजवळ १५ दुष्काळ पडले. त्यात १७६९—७० मधील बंगालच्या दुष्काळात अंदाजे १/३ प्रजा ही दुष्काळाच्या दाहकतेत मृत्युमुखी पडली. यावर कंपनी सरकारने कोणतीही उपाय योजना राबविली नाही. किंवा मदत कार्य केले नाही. एवढेच नव्हे तर दुष्काळात कमी भावाने तांदुळ खरेदी करून जास्त भावात विकला व प्रचंड नफा मिळवला. इ.स.१७८१—८२ मध्ये मद्रास व १७८४ मध्ये संपुर्ण उ.भारतात दुष्काळ पडला. कंपनी सरकारने मदतीचे कार्य केले परंतु ते पुरेसे नव्हते १८३३ मध्ये गुंटुर जिल्हात ५लक्ष पैकी २लक्ष प्रजा मृत्युमुखी पडले. तसेच १८३७ मध्ये पुन्हा उ.भारतात भिषन दुष्काळ पडला त्यात कंपनी सरकारने काही सार्वजनीक उपक्रम सुरू केले. परंतु मदतीचे कार्य केले धर्मार्थ संस्थांनाच करावे लागले. त्यामुळे मदत कार्य दुष्काळ पीडितापर्यंत पोहचलेच नाही. त्यामुळे भयंकर प्राणहानी व वित्तहानी झाली. यावरून कंपनीच्या शासनकाळात दुष्काळापासुन सामान्य जनतेला वाचवण्यासाठी व मदतकार्यासाठी सुनिश्चित अशी कोणतीही उपाययोजना नव्हती या काळामधील दुष्काळात ग्रामीण क्षेत्रातील शांतता व सुव्यवस्थेची स्थिती इतकी बिघडली की, ग्रामीण भागातील धनीकच नव्हे तर प्रशासकाचाही हृदयाचा थरकाप उडाला. त्यामुळे दुष्काळपिडीत जनतेला कंपनी सरकारकडुन भरीव स्वरूपाची मदत कार्य मिळाले.

भारताचे प्रशासन कंपनीकडुन ब्रिटीश राजपदाकडे हस्तांतरीत होणे व रेल्वे व इतर संचार साधनांचा विकास, परकिय व्यापाराची उन्नती यामुळे दुष्काळ या समस्येचे स्वरूप बदलुन गेले. बिटीश सरकारलाही ह्या गोष्टीची जाणिव झाली. भारतातील दुष्काळ निवारणार्थ सिंचाई कार्याचा विस्तार करणे, कृषी संबंधी कायदे करणे, दुष्काळ निवारण्यासाठी प्रयत्न करणे. ब्रिटीश सरकारने एक दुष्काळ धोरण ठरविने ही आपली जबाबदारी आहे. या कालखंडामध्ये साधारनत: १० भयंकर दुष्काळ पडले. इ.स. १८६०—६१ मध्ये दिल्ली व आग्रा परदेशात दुष्काळ पडला. हा पहिला प्रसंग होता की, दुष्काळ पिडीतांना राहण्यासाठी व्यवस्था करण्यात आली. त्यातुन दुष्काळाच्या कारणांची भिषणतेची चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी कर्नल स्मिथ नियुक्ती केली. त्यांच्या अहवालात ठोस प्रकारची सुचना नव्हती. इ.स.१८६६ मधील ओरिसातील दुष्काळ याची भिषनता जास्त असुन सुद्धा दुष्काळात तोंड देण्याची कोणतीही तयारी केली नाही. तर सरकार मागनी व पुरवठा या सिध्दांताचे अनुकरण करत होते. त्यामुळे १३ लक्ष लोक मृत्युमुखी पडले. हा दुष्काळ परिवर्तन बिंदु सिध्द झाला. सरकारने जॉर्ज कॅम्पबेलच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन झाली. इ.स.१८७६—७८ मधील दुष्काळात मद्रास मुंबई,उतरप्रदेश, पंजाब, या राज्यात भिषण दुष्काळ पडला यात ५ कोटी ८०लाख जनता दुष्काळाच्या तावडीत सापडली. दुष्काळ निवारनार्थ सरकारने वरवरचे प्रयत्न केले.

दुष्काळाचे स्वरूप एवढे भयंकर होते की, प्रजेला वाचवण्याची आपली जबाबदारी नाकारतांना सरकारने जिवीताचे रक्षन करणे हे आपल्या शक्तिबाहेरचे आहे. हे स्पष्ट केले, ब्रिटीश सरकारच्या कालखंडात ठरावीक कालांतर दुष्काळ पडतच राहीले. यामध्ये १८९६—९७, १८९९—१९००, १९०१—१९४१ या दरम्यान अनेक प्रकारची दुष्काळी स्थिती निर्माण झाली यात हजारो लोक मृत्युमुखी पडले. भारतात पडणा—या अनेक दुष्काळापैकी सर्वात भिषन व महा भयंकर दुष्काळ म्हणुन १९४२—४३ बंगालच्या दुष्काळात हजारो लोक मरण पावले. या दुष्काळचे स्वरूप बघतांना ब्रिटीश सरकारचे धोरनामुळे तसेच १९३९ चे दुसरे महायुद्ध यामुळे या दुष्काळात देवापेक्षा मानवाचाच हात जास्त होता असे दिसुन येते.

ब्रिटीशांनी दुष्काळ पिडीतांसाठी केलेल्या उपाय योजना :—

भारतात वारंवार पडणारा दुष्काळ व निवरणार्थ काही उपाययोजना केल्या त्या लक्षात घ्याव्या लागतील. लॉर्ड लिटन यांनी इ.स.१८८०ला दुष्काळावर कायम स्वरूपी मात करण्यासाठी स्ट्रेची अध्यक्षतेखाली दुष्काळ समिती नेमली. त्या अहवालात त्याने उपासमार होण्यापुर्वी रोजगार संधी उपलब्ध करावी रोजगार मोबदला वेळोवेळी निश्चित करावा, अनाथांना अन्याय देणे शासनाचे कर्तव्य, शिबीरे उघडावी अन्यधान्याची निर्यात दुष्काळ काळात थांबवावी, जमिन महसुल व इतर कर कमी करावेत, दुष्काळ निवारन खर्च प्रांतांनी करावा, पशुचे स्थलांतरन इतरत्र करावे. या शिफारसी स्विकारून १८३३ मध्ये दुष्काळ संहिता तयार करण्यात आली.

लॉर्ड कर्झन याने सुद्धा दुष्काळ निवारणार्थ लॉर्ड मॅकडोनेल दुष्काळ समिती १९०१ मध्ये नेमली त्या अहवालात त्याने शेतसारा स्थगित करावा., अन्यधान्य व जनावरांना चारा, बी—बीयाने सहाय कोष, रोजगार संधी, कृषी बॅक स्थापन करावी, जल सिंचनासाठी कालवे काढावे इत्यादी शिफारसी केल्या कर्झनने १९०१ ला च्ंदरंइ संदक ेसपउंजपवद संम्मत करून कर्ज बाजारी शेतक—यांची कर्ज माप केली, को—ऑप. सोसायटीज शेतक—यांना कर्ज मिळावेत म्हनुन स्थापन केल्यात ५० : उत्पादन नै.आपत्तीने नष्ट झाल्यास शेतसारा रद्द चे अधिकार जिल्हा अधिका—यांना दिले, कृषी मार्गदर्शनासाठी कर्झननी १९०१ ला इन्पेक्टर जनरल नेमले बंगालमध्ये पुसा येथे कृषी संशोधन केंद्र उभारले.

**निष्कर्ष:—**

ब्रिटीश कालीन दुष्काळ व दुष्काळ निवारण धोरण यामध्ये भारतीय शेती मान्सुनवर आधारीत असल्याने भारतात कोणत्या न कोनत्या भू—प्रदेश दुष्काळ प्रवण क्षेत्रात मोडतो. भारतीय भू.प्रदेशाची व्यापकता आणि मान्सून हवामान हे घटक दुष्काळाबाबत लागु पडतात. शेतक—यांचा दु—ख परिहार करण्याकरीता जे प्रयत्न केले गेले. त्यातील महत्वाचे म्हणजे शेतसारा व कूळ जमीनदार हितसंबंध दुष्काळसुद्धा शेतसारा जबरदस्तीने गोळा करण्यात येत. असे ब्रिटीश सरकारच्या दुष्काळ निर्वारण कार्याबाबत दादाभाई नवरौजी, रमेशचंदु दत्त यांनी या प्रश्नाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. कॉग्रसने दुष्काळ बद्दल

सरकारलाच दोशी ठरविले. ब्रिटीश सरकारने राष्ट्रव्यापी धोरणाचा अवलंब केला नव्हताच त्यामुळे भारतीय जनतेची प्रचंड मोठ्या प्रमाणात जिवीत वित्त हानी झाली. असे स्पष्ट होते.

**संदर्भग्रथ :—**

०१.मराठी विश्वकोष साहित्य खंड ७
०२.इरफान हबीब —भारतीय अर्थ व्यवस्था
०३.घोष — बंगाल का आकाल
०४-Poverty and famine – a lice- Arundhati roy, Amartya sen.
05.Social cirsis and Eqidemic disease in the famines 19th centary India. - Arnold David .